http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

२० वर्षे

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# नगरपंचायतीच्या निवडणुका चालू असताना 15 डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी मतदान!!

**पहिल्या टप्प्यात राज्यातील 246 नगरपालिका आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा**

**21 दिवसात या निवडणुका पार पडतील व त्याच दरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होतील!!**

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार 31 जानेवारी पूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पार पाडली जाईल!!**

## दिलीप वळसे पाटील यांनी निवडणुकांच्या तारखा केल्या जाहीर ?

**पुणे : प्रतिनिधी**
**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तारीख आता अंतिम टप्प्यात आली असून राज्य निवडणूक आयोग पुढच्या आठवड्यात नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांची घोषणा करेल, अशी अपेक्षा आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील 246 नगरपालिका आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होईल. त्यानंतर पुढील 21 दिवसात या निवडणुका पार पडतील. त्याच दरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ही जाहीर केल्या जाणार आहेत. तर अखेरच्या टप्प्यात महापालिका निवडणूक होतील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार 31 जानेवारी पूर्वी निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.**





### 2017 साली कार्यकर्त्यांनी निवडणुकांसाठी जी मेहनत घेतली होती ती वाया गेली!!

निवडणूक आयोगाने अद्याप या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या नाहीत, तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित पवार गटाचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी या निवडणुकीच्या तारखांबाबत अंदाज व्यक्त केला आहे. आंबेगाव व शिरूर मधील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात वळसे पाटलांनी मोठी घोषणा केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आंबेगाव शिरूर आयोजित युवक युवती मेळाव्यात ते बोलत होते. दिलीप वळसे पाटील म्हणाले, 2017 साली महाराष्ट्र जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपंचायत व नगर परिषदेच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर राज्यात ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटलेला नाही. हे प्रकरण उच्च न्यायालयात आणि पुढे सर्वोच्च न्यायालयात गेलं, तिथेही हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे या निवडणुका तीन वर्षे पुढे ढकलल्या गेल्या. दरम्यानच्या काळात आपल्या कार्यकर्त्यांनी निवडणुकांसाठी जी तयारी केली होती, ती वाया गेली.

### कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश!

● आता दोन-तीन दिवसांनी निवडणुकांच्या तारखा जाहीर होणार असतील तर आपल्याला तयारी करावी लागेल. येथील स्थानिक निवडणुकीत 17 प्रभाग आहेत. त्यामुळे आपल्याकडून 17 लोकांना संधी मिळणार आहे. नगराध्यक्षांची निवड होणार आहे. सर्वांना संधी मिळणार नाही. ज्याला संधी मिळेल तो आपल्या पक्षाचा उमेदवार असेल. प्रत्येक उमेदवार हा घड्याळाचा (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) उमेदवार आहे. हे लक्षात ठेवून तुम्ही कार्यकर्त्यांनी काम केलं पाहिजे.

### दिलीप वळसे पाटलांनी जाहीर केल्या तारखा?

● दिलीप वळसे पाटील म्हणाले, माझ्या माहितीप्रमाणे नगरपंचायतीच्या निवडणुका चालू असतानाच जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर होतील. साधारणपणे 15 डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी मतदान होईल. त्याआधी नगरपंचायतीच्या निवडणुका होतील. जिल्हा परिषदेच्या निवडणुका चालू असतानाच महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होतील.

● 15 जानेवारीला त्यासाठीच मतदान होईल. 31 जानेवारी पूर्वी सर्व महानगरपालिका व नगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन हा निवडणूक कार्यक्रम संपलेला असेल आणि नवीन लोकांच्या हातात सत्ता मिळालेली तुम्हाला दिसेल.

### 31 जानेवारी पूर्वी सर्व निवडणुका पार पडणार!

● आता राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात या निवडणुकांबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

● त्यानुसार जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका 31 जानेवारी पूर्वी घ्यायच्या आहेत.

● सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, वाट्टेल त्या परिस्थितीत 31 जानेवारी पूर्वी या निवडणुका पूर्ण करायच्या आहेत.


## सुरेश (भाऊ) राका यांच्या निवासस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांची सदिच्छा भेट



**बीड : प्रतिनिधी**
भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते सुरेश भाऊ राका - भाजपाचे युवा नेते महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रवक्ते प्रदेश उपाध्यक्ष तथा दी वैद्यनाथ बँक सल्लागार व उपसंपादक नोटरी अॅड राहुलकुमार राका यांच्या निवासस्थानी महायुतीचे शिवसेनेचे मनमिळावू व्यक्तिमत्व नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख अॅड चंद्रकांत (आप्पा) नवले व तालुकाप्रमुख उद्धव (बापू) मडके यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यांच्या सत्कार राम लल्ला फ्रेम मोत्याची माळ देऊन करण्यात आला. यावेळी आगामी काळात निवडणुकी संदर्भात विविध विषया वर चर्चा करण्यात आली यावेळी सरपंच नवनाथ गवते, दत्तात्रय येवले, संभाजी चाळक, तेजस साबळे, राम चाळक, शिवराज उगले, कृष्णा गवते, स्वप्निल अबुज यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख व तालुकाप्रमुख यांनी सत्कार केल्याबद्दल राका परिवाराचे आभार मानले.

## यश ढाका हत्या प्रकरणी जनआक्रोश मोर्चाला हजारोंच्या संख्येने सामील व्हा

**भारत कांबळे यांचे आवाहन**



**बीड : अमोल जाधव**
बीड शहरातील वर्दळीच्या ठिकाण म्हणजे माने कॉम्प्लेक्स या माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी काही दिवसापूर्वी यश ढाका वय वर्ष २२ या तरुणाची एका टोळक्यांकडून निर्दयी पोटात धारदार शस्त्र खुपसून निघृण हत्या करण्यात आली, या घडलेल्या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा हादरला, आणि संपूर्ण बीड जिल्ह्याने हळहळले मात्र ज्या टोळीने हा खून केला त्या मधील चार आरोपी अटक असून काही आरोपी अद्याप फरार आहेत, या खुनाचा मुख्य सूत्रधार म्हणून युवासेनेचा जिल्हाप्रमुख गणेश शिराळे हा अद्याप मोकाट असून पोलिसांनी कसलाही तपास केला नाही आणि भूमिका घेतली नाही, म्हणून या प्रकरणामध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसून येत आहे असे देवेंद्र ढाका यांचे म्हणणे आहे. मात्र एक महिना उलटूनही अद्याप मुख्य सूत्रधाराला आरोपी करून अटक केलेली नाही, त्यामुळे बीड मधील सर्व जनतेने अन्यायाच्या विरोधात न्याय मिळवण्यासाठी काही मागण्या घेऊन ३ नोव्हेंबर २०२५ वार : सोमवार या दिवशी भव्य जण आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे, या मोर्चामध्ये प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे (१) यश ढाका खून प्रकरणातील मास्टर माईंड गणेश शिराळे यांच्यावर गुन्हा नोंद करून तात्काळ अटक करण्यात यावी. (२) घटनास्थळी हजर असणारे व आरोपींना मदत करणाऱ्यांना सहआरोपी करावे. (३) या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी. (४) हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे. (५) सर्व आरोपींची नार्को टेस्ट करण्यात यावी. या प्रमुख मागण्या घेऊन अन्य मागण्या घेऊन हा मोर्चा ३ तारखेला सकाळी ११:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी ● पान २ वर...

## महाराष्ट्रासाठी पुढील 24 तास महत्त्वाचे

### कुठे कोसळणार मुसळधार पाऊस, जाणून घ्या सविस्तर



मुंबई : मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशभरात पावसाच्या जोरदार सरी बरसत आहेत. नोव्हेंबर उजाडला तरी पावसाचे प्रमाण कमी होत नसल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. यात आता महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजामुळे प्रशासनाने पुन्हा एकदा अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा कायम असल्याने पुढील काही दिवस फक्त राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात पाऊस असण्याचे संकेत आहेत. ज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पश्चिम बंगाल, सिक्किम, बिहार या भागात जास्त पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच अंदमान निकोबार येथेही अतिमुसळधार पाऊस होणार आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सतत हजेरी लावताना दिसतोय. आज सकाळीसुद्धा अनेक भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. तर काही जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण झाल्याचे दिसले. नोव्हेंबर महिन्याला सुरूवात झाली असून पाऊस अजूनही सुरू असल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. तसेच अतिवृष्टी झालेल्या जिल्ह्यात शेती वाहून गेल्याने ● पान २ वर...

### महाराष्ट्रात कुठे पडणार मुसळधार पाऊस ?

पुढील २४ तासात कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मध्यम ते मुसळधार पाऊस होऊ शकतो. नंदूरबार, जळगाव, धुळे, आहिल्यानंतर, पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर, बीड, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागात पावसाची शक्यता आहे.

**➤ जय भवानी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक एकता दौडमध्ये पोलीस कर्मचारी व शालेय विद्यार्थी सहभागी**

## केज शहरात लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंतीनिमित एकता दौडचे आयोजन

**केज : प्रतिनिधी**
शहरात पोलिस उपविभाग केज यांच्या वतीने लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित एकता दौड चे आयोजन करण्यात आले होते.

केज शहरात पोलिस अधिकारी कर्मचारी, पत्रकार बांधव, रोटरी क्लब, विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व सर्वज्ञ अकॅडमी चे विद्यार्थी आणि आवड एज्युकेशनचे विद्यार्थी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक यांनी सहभाग नोंदला होता. तसेच वरील सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत एकता दौड चे परेड संपन्न झाली. केज शहरातील जय भवानी चौक येथून एकता दौडला सुरुवात झाली व या दौडमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकता दौड केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत सर्व केज शहरातील सामाजिक राजकीय व शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन एकता दौडची शोभा वाढवली या कार्यक्रमाची सांगता केज पोलीस स्टेशन येथे करण्यात आली. यावेळी केज पोलीस ठाण्याच्या वतीने केळी व पाण्याचे वाटप करण्यात आले.



## आजचे राशि भविष्य

### मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# कुठे थांबायचे नक्की झालं तो संतुष्ट...

कौन बनेगा करोडपती हा बौद्धिक, मनोरंजनाचा कार्यक्रम मला अतिशय आवडतो. आपल्या बुद्धीत भर पडते. जेंव्हा जेंव्हा माझं उत्तर बरोबर येतं तेव्हा मला खूप आनंद होतो. परवाच्या भागात फास्टेस्ट फिंगर मध्ये अव्वल ठरलेले नीरज सक्सेना हॉट सीटवर आले. एकदम शांत रीतीने बसले. किंचाळत, डान्स करत, रडत, हात उंचावत, अमिताभला जोरात मिठी मारत यातलं त्यांनी काहीही केलं नाही. ओळख सांगायची तर ते सायंटिस्ट आहेत. पीएचडी आहेत व कोलकत्यातील एका विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. अतिशय प्रसन्न, साधं व्यक्तिमत्त्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांसोबत काम करायला मिळालं हे जीवनातील भाग्य ते समजतात. त्यांनी सांगितलं की प्रथम मी माझाच विचार करत होतो परंतु कलामांच्या सान्निध्यात राहून मी माझ्याबरोबर दुसऱ्यांचा व राष्ट्राचा विचार करू लागलो.

नीरजजी खेळू लागले. एकदा ऑडियन्स पोल घेतलं परंतु दुगुनास्त्रमुळे त्यांना ती लाईफ लाईन पुन्हा मिळाली. सर्व प्रश्नांची उत्तरं त्यांनी सफाईदारपणे दिली. त्यांच्या बुद्धीमत्तेची चुणूक पाहून थक्क व्हायला झालं. तीन लाख वीस हजार जिंकून, बोनस तेवढीच रक्कम मिळविली मग ब्रेक झाला.

ब्रेक नंतर अमिताभ बोलू लागले... चलिए डॉक्टरसाब अब आप के सामने आ रहा है ग्यारह वा प्रश्न... ए रहा प्रश्न... इतक्यात नीरजजी म्हणाले... सर मैं क्विट करना चाहता हूँ.. अमिताभ बच्चन यांना आश्चर्य वाटले. इतकं चांगलं खेळणारे, तीन लाईफ लाईन जीवित असताना. करोड रुपये सहज जिंकतील असं असताना खेळ सोडत आहेत का? विचारलं... आज तक ऐसा कभी हुआ नहीं..

नीरजजी शांतपणे म्हणाले... माझ्या शिवाय आणखी खेळाडू वाट पहात आहेत व ते माझ्या पेक्षा लहान आहेत. त्यांनाही संधी मिळाली पाहिजे तसं तर मला खूप पैसे मिळाले आहेत. मला वाटतं जो प्राप्त है पर्याप्त है. अधिक की आशा नहीं है.



अमिताभ बच्चन अवाक् झाले. सर्वत्र शांतता पसरली. एक सेकंद स्तब्धता होती. नंतर सर्वांनी खूप वेळ उभं राहून टाळ्या वाजवून त्यांचं कौतुक केलं. अमिताभ म्हणाले... खूप काही शिकायला मिळालं. नतमस्तक व्हावे अशी व्यक्ती आज पहायला मिळाली. खरं तर एवढी संधी समोर असताना केवळ दुसऱ्यांना संधी मिळावी व जे मिळालं तेवढं खूप आहे असा विचार करणारी पहिलीच व्यक्ती माझ्या पाहण्यात आली. मनातून मी त्यांना नमस्कार केला.

आज जगात केवळ पैसा कमविण्यासाठी माणूस धडपडत आहे. कितीही

## आवडलेलं काही

पैसा कमवला तरी समाधान नाही. हाव कमी होत नाही. कमीच पडतो. या पैशा मागे लागून घर, झोप, ननाती, प्रेम, मैत्री या साऱ्या गोष्टींना तो मुकत आहे. पैशाचा हव्यास संपत नाही. अशा वेळी डॉ. नीरज सक्सेना सारखी देव माणसं येतात व बोध देऊन जातात. या कलियुगात अशा समाधानी, अल्पसंतुष्ट माणसांचं दर्शन दुर्लभ झालेलं आहे. त्यांनी खेळ सोडल्यानंतर एक मुलगी हॉट सीट वर येऊन बोलू लागली... तीन मुली झाल्या म्हणून वडिलांनी आई सहित आम्हाला बाहेर काढलं. आम्ही एका आश्रमात राहतो... मी विचार केला की नीरजजींनी खेळ सोडला नसता तर शेवटचा दिवस असल्याने कुणालाही संधी मिळाली नसती. आज त्यांच्या त्यागाने एक गरीब मुलीला चार पैसे मिळण्याची संधी प्राप्त झाली. जगात इस्टेटीतला एक पैसा सोडायची तयारी नसते. त्यासाठी भांडणे. खून खराबा होताना आपण पाहतो. स्वार्थ बोकाळलाय सर्वत्र. परंतु हे उदाहरण अपवाद आहे. देव माणसात असतो. ते नीरजजी सारख्या दु ऱ्याचा, देशाचा विचार करणाऱ्या माणसात. मी आयुष्यात कधीच या थोर माणसाला विसरणार नाही. आज माझ्या आवडीच्या विषयावर म्हणजेच अनोख्या व्यक्तिमत्त्वाविषयी लिहायला मिळालं याचा आनंद आहे. गरज भागली की माणसानं थांबावं व दुसऱ्यांना संधी द्यावी. स्वार्थाचा त्याग करावा. सर्व सुखी होतील. हा धडा शिकायला मिळाला. मला नेहमीच अशा व्यक्तिंविषयी आदर वाटतो व समाजाच्या उन्नतीसाठी परखडपणे लिहावं लागतं.

**वर्षा ठोंबरे-फुटाणे**
छत्रपती संभाजीनगर
(यांच्या फेसबुक वॉलवरून साभार)

# वृक्षसंपदेचे महत्त्व पटवून

## विशेष

● लता गुढे

रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली झाडे आणि त्यांच्या एकमेकांमध्ये गेलेल्या फांद्या यामुळे रस्त्यावर कायम सावली असायची. पण वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक झाडांची बेसुमार तोड करण्यात आली आहे. पुढील काळात माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. जमिनीचा टाहो कमी करण्यासाठी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हा संत तुकाराम महाराजांचा अभंग, प्रत्येकाला वृक्षसंपदेचे महत्त्व पटवून देणारा आहे, तो अंगीकारायला हवा, तरच पुढील पिढ्या सुखाने, आनंदाने जगतील.



मागच्या आठवड्यात नगर जिल्ह्यामध्ये पाथर्डी येथे माहेरी जाऊन आले आणि एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे बाहेर पेटलेला उन्हाच्या आगीचा वणवा इतका जास्त होता की, दुपारी १२च्या नंतर गाडीतील एसीही काम करेनासा झाला. बाहेर ४१ अंश तापमान होते. बाजूला नांगरलेली जमीन टाहो फोडत होती आणि रस्त्यांच्या बाजूला तुरळक उभी असलेली पानगळ झालेली झाडे उघड्या अंगाने असह्यपणे हुसासे टाकत होती. रस्त्याच्या बाजूला पसरलेली शहरे, इमारती, भरधाव वेगाने धावणाऱ्या गाड्या आणि रस्ता रुंदीकरणासाठी पूर्वी कापलेली मोठमोठी झाडे, वाढलेली प्रचंड उष्णता यांमुळे मृगजळाचा महापूर रस्त्यावर ओसंडून वाहत होता. हे सर्व पाहताना आईची ओवी आठवली

उन्हाळ्याचं ऊन, झाडाला नाही पान
जंगल पाखराचं, उदास झालं मन

पानझड झालेली झुडपं उदासपणे उघड्या अंगाने उन्हात होरपळून निघाली होती. हे पाहताना मनात सारखा विचार येत होता कधी माणसांचे डोळे उघडतील? पूर्वी रस्त्याच्या बाजूला मोठमोठी वडाची, पिंपळाची, लिंबाची झाडं असायची त्यामुळे रस्त्याने जाताना थंडावा जाणवायचा. यावर्षी महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळ आहे. नद्या, पाण्याचे पाणवठे आणि शेततळी कोरडी ठणठणीत झाली आहेत. शिरूरची घोड नदी ओलांडली आणि पुढे सुप्याच्या आसपास असलेले हिरवे शिवार पाहून जरा हायसं वाटलं. लगेच उष्णतेचा काटा खाली आला. जिथे पाणी, पाण्याखालची जमीन, आजूबाजूला असलेली हिरवीगार झाडं त्यामुळे उष्णतेचा परिणाम कमी जाणू लागला.

एक मोठं कापलेलं झाड पाहून, काही दिवसांपूर्वी कुठे तरी एक बातमी वाचलेली आठवली, ती बातमी अशी होती की,

पुणे महानगरपालिकेकडून साधारण ३०० झाडांची कत्तल करण्यात येणार आहे. रस्त्यांचं रुंदीकरण आणि पार्किंग उपलब्ध करून देण्यासाठी या झाडांची कत्तल करण्यात येत असल्याचं महापालिकेकडून सांगण्यात आलं आहे. या बातमीचा विचार मनाला चटका लावून गेला. कित्येक वर्षांपासून उभी असलेली डेरेदार झाडं आणि ती कापल्यानंतर ओसाड होणारा परिसर या कल्पनेनेच अंगावर काटा आला आणि मुंबईमध्येही आजूबाजूला पाहिलं की, आपल्या लक्षात येतं, सर्रास होत असलेली झाडांची कत्तल. मान्य आहे की, आपल्याकडे प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे, त्यावर काही कंट्रोल नाही. सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी इमारती, पूल आणि रस्ते रुंदीकरण होणे या गोष्टी प्रत्येक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात केल्या जात आहेत. त्याबरोबरच तोडलेली झाडे परत लावली गेली आहेत का? त्याचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आधीच जळण्यासाठी, फर्निचर, दरवाजे, खिडक्यांसाठी झाडे तोडली गेली आहेत. वन खात्याने डोंगर–पठारावर काही प्रमाणात झाडे लावली आहेत, ही जमेची बाजू आहे; परंतु प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य समजून शक्य होईल, तिथे झाडे लावायला हवीत. आणखी काही प्रमाणात शेततळे निर्माण होणे गरजेचे आहेत.

मी २००७ रोजी विलेपार्ले येथे राहायला आले. त्यावेळी मे महिन्यामध्येही भर दुपारी रस्त्याने चालताना, कधीही ऊन लागत नव्हते, कारण रस्त्याच्या दोन्ही बाजूला उंच वाढलेली झाडे आणि त्यांच्या एकमेकांमध्ये गेलेल्या फांद्या यामुळे रस्त्यावर कायम सावली असायची; परंतु आता उंच इमारतीची संख्या वाढत चालल्यामुळे, रस्ता रुंदीकरणाच्या कारणामुळे रस्त्याच्या बाजूची अनेक मोठमोठी झाडे तोडली गेली आहेत आणि पुन्हा झाडे लावण्यासाठी रस्त्याच्या बाजूला कुठेही जागा ठेवली नाही आणि जी झाडं उभी आहेत त्यांच्या मोठमोठ्या फांद्या वर्षातून दोन ते तीन वेळा कापल्या जातात. त्यामुळे झाडांचे फक्त शेंडे उरतात आणि कालांतराने अशी झाडे मृत पावतात. माझ्या घराच्यासमोर पिंपळाचं आणि गुलमोहराचं झाड आहे. या झाडाच्या मोठमोठ्या फांद्या तोडल्या की, मनाला वेदना होतात आणि हिरव्यागार फांद्यांची कटिंग करून, त्याची लाकडं ट्रकमध्ये भरून घेऊन जाताना पाहिलं की असं वाटतं, किती निर्दयपणे झाडांची कत्तल करून, त्याचे हात–पाय तोडून ही माणसे ट्रकमध्ये घालून घेऊन जात आहेत. या विचाराने माझ्यासारख्या सर्जनशील कवयित्रीच्या मनाला होणारी वेदना असह्य होते.

वाढणारी भरमसाट लोकसंख्या आणि लोकांना राहण्यासाठी प्रत्येक वर्षी हजारोंच्या संख्येने इमारती उभ्या राहतात. त्यामुळे सर्वच शहरांमध्ये सिमेंटची जंगल वाढली आहेत. रस्ता रुंदीकरण, गाड्यांची भरमसाट वाढ यांमुळे तापमानात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. जर ही वाढ अशीच होत गेली, तर याचे परिणाम भविष्यामध्ये काय होतील, याचा आपण आज विचार केला नाही, तर आपल्या सर्वांनाच अशा नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागेल याचा विचार व्हायला हवा. फक्त विचारच नाही, तर ठोस पाऊल उचलायला पाहिजे.

'झाडे लावा, झाडे वाढवा', 'पाणी आडवा पाणी जिरवा' अशा घोषणा आपण फक्त देत आहोत; परंतु त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात केली जाते? यावर मात्र विचार होत नाही. ग्रामीण भागामध्ये अजूनही याविषयी गांभीर्याने पाहिलं जात नाही, तिथे राहणाऱ्या लोकांचे विचारपरिवर्तन होत नाही. पिकांना विसावा नको म्हणून बांधावरची झाडं तोडली जातात. तिथे कोणताही नियम त्यांना लागू होत नाही. एक वर्षे पाऊस पडला नाही, तर किती प्रमाणात उष्णतेचा दाह वाढला आहे, याची जाणीव घराबाहेर पडल्यानंतर प्रकर्षाने होते. वरील कारणांचा हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर परिणाम होत आहे. यामुळे वातावरणात नैसर्गिकरीत्या निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंमध्ये प्रचंड प्रमाणात भर पडते, ज्यामुळे हरितगृह परिणाम आणि ग्लोबल वॉर्मिंग वाढते. याचा परिणाम माणसांच्या शरीरावरही मोठ्या प्रमाणात होत असतो.

माणसाच्या शरीरातील उष्णता वाढल्याने, रक्तदाब कमी होतो, त्यामुळे अनेकांना थकवा जाणवतो. काही माणसांच्या नाकातून रक्त प्रवाह वाहू लागते. तसेच अशक्तपणा येतो, अस्वस्थता निर्माण होते. शरीराची उष्णता वाढून, उष्माघाताने जीवावरही बेतू शकते, त्यामुळे याकडे दुर्लक्ष करू नये. ज्यांना उष्णतेचा त्रास आहे, त्यांना वारंवार अंगावर फोड येण्याची समस्या निर्माण होते. उघड्यावर राहणारे प्राणी, पक्षी मरतात. यावर आता प्रत्येकाने जाणीवपूर्वक विचार केला गेला पाहिजे आणि येणाऱ्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करायला हवी, तरच पुढील काळात माणसाला सुसह्यपणे जगता येईल.

डोळे उघड माणसा
ऐक माझं तू मागणं
पाहा जरा भुईकडं
टाहो फोडते जमीन
हा जमिनीचा टाहो कमी करण्यासाठी

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हा संत तुकाराम महाराजांचा अभंग, प्रत्येकाला वृक्षसंपदेचे, वनसंपदेचे महत्त्व पटवून देणारा आहे, तो अंगी कारायला हवा, तरच पुढील पिढ्या सुखाने, आनंदाने जगतील.

# कडधान्य अधिक फायदेशीर

कडधान्याला एनर्जीचे पॉवर हाऊस असे म्हटले जाते. बहुतेक लोक सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करतात जेणेकरून ते दिवसभर उर्जेने भरलेले राहतील. कडधान्यमध्ये व्हिटॅमिन ए, बी, सी आणि ई सारखे अनेक आवश्यक पोषक घटक आढळतात. यामध्ये फायबर, कॅल्शियम आणि लोह देखील मुबलक प्रमाणात असते. त्यात जास्त फायबर असल्यामुळे त्यात कॅलरीज खूप कमी असतात, ज्यामुळे वजन सहज कमी होण्यास मदत होते. पण अशा स्थितीत कडधान्य कच्चे खावेत की उकळून खावेत, जे खाल्ल्याने पोट चांगले राहते. असा प्रश्न पडतो.

- कच्च्या कडधान्यामध्ये फायबर मुबलक प्रमाणात आढळते, ते उकळताना त्यातील पोषक तत्वे काही प्रमाणात कमी होतात, परंतु असे असले तरी, दोन्हींचे सेवन आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते.
- कच्च्या कडधान्यामध्ये कॅलरीज खूप कमी असतात आणि त्यात जास्त फायबर असते. त्यामुळे लठ्ठपणा कमी करण्यासाठी हे फायदेशीर मानले जाते.
- जर तुमची पचनसंस्था कमकुवत असेल तर कच्च्या कडधान्यामध्ये असलेले बॅक्टेरिया आणि एन्झाईम्स तुमच्या पचनसंस्थेवर परिणाम करू शकतात.
- जर तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असेल तर तुम्ही बिनदिक्कत कच्च्या कडधान्याचे सेवन करू शकता. यात तुम्हाला कोणतीही अडचण येणार नाही.



- उकडलेले कडधान्य मऊ आणि चवदार असतात. शिवाय ते पचायलाही सोपे असतात. अशा परिस्थितीत ज्यांना आतड्यांसंबंधी समस्या आहेत त्यांनी फक्त उकडलेले कडधान्याचे सेवन करावे.
- जर पोटाशी संबंधित समस्या उद्भवत असतील तर तुम्ही उकडलेल्या कडधान्याचे सेवन करावे.

## कडधान्याचे सेवन या समस्यांवर फायदेशीर आहे

- कडधान्य पचनासाठी उत्कृष्ट मानले जातात. यामध्ये असलेले एन्झाईम्स तुमची बिघडलेली पचनक्रिया सुधारतात.
- कडधान्याचे सेवन केल्याने दृष्टी सुधारते. यामध्ये असलेले अँटी–ऑक्सिडंट डोळ्यांच्या पेशींना फ्री रॅडिकल्सपासून वाचवतात.
- जर तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असेल तर तुम्ही कडधान्याचे सेवन करावे. यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते ज्यामुळे तुमची प्रतिकारशक्ती वाढते.

## महाराष्ट्रासाठी पुढील २४ तास महत्तवाचे

● पान १ वरून... शेतकरी चिंतेत आहे. दिसतंय. पावसामुळे शेतींचे मोठे नुकसान झाले.

दरम्यान, मोंथा चक्रीवादळामुळे राज्यात पाऊस असल्याचे सांगितले जात होते. मात्र, मोंथा चक्रीवादळ शांत झाले असूनही देशातील विविध भागांमध्ये पावसाच्या सरी कोसळताना दिसत आहेत.

## जनआक्रोश मोर्चाला हजारोंच्या संख्येने सामील व्हा'

## यश ढाका हत्या प्रकरणी

● पान १ वरून... कार्यालयावर निघणार आहे. मोर्चाला बीड जिल्ह्यातील नागरिक तसेच पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते व विविध पक्ष, संघटना उपस्थित राहणार असून जनतेने देखील हजारोंच्या संख्येने या अन्यायाच्या लढाईमध्ये सामील होऊन मयत यश ढाका याला न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र यावे व अन्यायाच्या विरोधात आवाज उठवावा अशी विनंती आणि आव्हान पेठबीड मधील युवा नेते भारत कांबळे यांनी केली आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# गेवराई रोटरी क्लबने स्थानिक कलावंतांना संधी दिली - हरिशजी मोटवाणी

## ➤ कलावंतांची भूमी असलेल्या मांदियाळीत मला येता आलं हे माझं भाग्य - अभिनेत्री शोभा कुलकर्णी ➤ गेवराई येथे दीपोत्सव स्वरांजली कार्यक्रम संपन्न

**गेवराई, दि . १ (प्रतिनिधी)** – विखुरलेल्या प्रथितयश व नवोदित गायक व वादक यांना एका धाग्यात आणून सुंदर स्वरांची माळ गुंफवून त्यांना कलामंच उपलब्ध करून देण्याचे कार्य रोटरी क्लबने केल्याचे कौतुक माजी प्रांतपाल हरीषजी मोटवाणी यांनी केले तर गेवराईने नंदू माधव, डॉ . गणेश चंदनशिवे, ॲड सुभाष निकम, डॉ सुधीर निकम, प्रशांत रुईकर , शाहीर विलास सोनवणे , संगीता जोशी ( भावसार ) , रावबा गजमल यांच्या सारखे कलावंत घडविले अशा भूमीत मला गुरुंच्या सानिध्यात रोटरी क्लबच्या माध्यमातून येता आलं हे माझं भाग्यच समजते असे भावोदगार अभिनेत्री शोभा कुलकर्णी यांनी काढले . रोटरी क्लबचे उपाध्यक्ष सुदाम धुपे यांच्या कोल्हेर रोडवरील साईसिद्धी हॉलमध्ये २५ ऑक्टो २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ गेवराई व गेवराईकर कलावंत यांच्या संयुक्त विद्यमाने व रोटरी इंटरनॅशनल प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित दीपोत्सव स्वरांजली कार्यक्रमास सिने अभिनेत्री तथा निवेदिका शोभा कुलकर्णी , रोटरी इंटरनॅशनल ३१३२ चे माजी गर्व्हनर रो . हरीशजी मोटवाणी , श्रीपाद कुलकर्णी , रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे माजी अध्यक्ष संजयजी गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत सायं ६ . ३० ते १० .३० या वेळेत बहारदार कार्यक्रम संपन्न झाला . रोटरी क्लब व गेवराई तालुक्यातील प्रथितयश व नवोदित गायक आणि वादक यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या स्वरांजली कार्यक्रमात जवळपास ४० गायक – वादक यांनी सहभाग घेऊन गोंधळ , गवळण, भजन, अभंग, भावगीत, प्रेमगीत, भक्तिगीत, देशभक्ती गीत गझल असे विविध ढंगाचे कलाप्रकार सादर केले . स्वरांजली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्तम सोलाने , जेष्ठ रंगकर्मी विधिज्ञ सुभाष निकम, प्रकाश भुते, विष्णू खेत्रे, शाहीर विलास सोनवणे, अशोक मोटे ,ओम साळुंके यांनी विशेष परिश्रम घेतले . संगीतसाथ दीपक लांडगे ,समीर कुलकर्णी ,अमोल लांडगे यांनी दिली .कार्यक्रमाची सुरुवात रोटरी इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केले . प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र





बरकसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सचिव प्रविण जैन यांनी मानले . स्वरांजली कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अभिनेते प्रशांत रुईकर व प्रा . शरद सदाफुले यांनी केले . कार्यक्रमास प्रोजेक्ट चेअरमन धर्मराज करपे, राजेंद्र डेंगे, क्लब ॲडमिनिस्ट्रेटर गणेश कुलकर्णी, पब्लिक इमेज डायरेक्टर सुरेंद्र रूकर , मेंबरशीप डेव्हलपमेंट डायरेक्टर राधेशाम येवले, डिस्ट्रीक्ट एम्फसीस डायरेक्टर शरद खरात, जयराज कौरानी , मनोज वाधवाणी उपस्थित होते . याप्रसंगी रो . हरीश मोटवाणी व शोभाताई कुलकर्णी यांनी समयोचित मार्गदर्शन केले . सहभागी कलाकारांना मान्यवरांच्या हस्ते रोटरी सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले . ४ तास चाललेल्या या कार्यक्रमाची सुरुवात शेख खाजा याच्या गणेश स्तवनाने झाली . त्यानंतर कैलास टोणपे व सुदाम सरोदे यांच्या देवीचा गोंधळ गीताने व शेख खाजा यांच्या – " जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया रहती है " या गीताने धमाल उडवून दिली . प्रमुख अतिथी रोटरीचे माजी प्रांतपाल यांनी राजेश खन्ना यांच्यावर चित्रित किशोरकुमारने गायिलेले मेलडी गीत साभिनय सादर करून रसिकांना सुखद धक्का दिला . प्रसिद्ध अभिनेत्री शोभा कुलकर्णी यांनी कलाकारांचे कौतुक करीत नाट्यसंवाद साभिनय करून रसिकांना गहिवरून टाकले . विष्णुप्रसाद खेत्रे यांचं " पल पल दिल के पास तुम रहती हो . – , कमलाकर रोकडे यांचं " तेरे गोरे गोरे गाल मुझे मार ना डाले ", प्रा . सुनील मुंडे यांचं " निले निले अंबर पर चाँद जब आये ", शकुंतला खरातांचं " मै ना भूलूंगा मैं , ना भूलूंगी ", अनुजा राऊत – पदरात घे गं येडामाय, भागुजी मगरेचं मेरा मुल्क मेरा देश , माऊली चव्हाण यांचं बाजाराला विकाया निघालीया दूध ही गवळण , श्रद्धा मडकरचं फुलले रे क्षण माझे , आशा चपळगावकर यांचं सरे गं काजळ घालुनी , सुनंदा कुलकर्णी यांनी आईचा गोंधळ,प्रशांत रुईकर यांनी हे अंजनीच्या सुता तर ज्ञानेश्वर पठाडे हिचे कानडा राजा पंढरीचा , आदिती पंडित व श्रीराज पंडित या बंधू – भगिनीने माझी रेणुका माऊली गीत सादर केले . रविंद्र पांडे याने ढगानं आभळं दाटलं गं , सुरेखा रामदासी यांनी जाऊ दे ना मला मथुरेला, गोविंद मुळेची विठ्ठलाला अभंगाद्वारे विनवणी , प्रकाश भुते यांनी शेवटी " चलते चलते मेरे ये गीत याद रखना गीत सादर केले . भजनसम्राट तुळशीराम आतकरे यांच्या कन्या गाथा हिने गायिलेल्या अभंगाने उपस्थित रसिकांना भुरळ घातली . संगीत साथ दीपक लांडगे व शाहीर विलास सोनवणे , ( हार्मोनियम ), समीर कुलकर्णी ( तबला ), अमोल कांबळे ( ढोलकी ), कृष्णा गव्हाणे ( मृदुंगवादन ), वैभव सातपुते व पदमाकर सरोदे ( संबळ ) वादन केले . उपस्थितांचे आभार ॲड . सुभाष निकम यांनी मानले .

याप्रसंगी विश्वास चपळगावकर, प्रकाश दावणगिरे, जानकीराम जोशी, अरुण वायचळ, विजयकुमार बोर्डे, श्रीराम आरगडे, कैलास मडकर, अरुण परदेशी, शंकर सूर्यवंशी, कैलास पट्टे, सखाराम कानगुडे, अमित शिखरे, प्रभाकर घोडके, माऊली बेद्रे, जितेंद्र गायकवाड , पंडित , नागनाथ घसींग, कैलास जोगदंड , सौ . ---प्रवीण जैन, अनिता विष्णू खेत्रे, रेणुका प्रशांत रुईकर, सुवर्णमाला बोर्डे, ईश्वर आबदरे , ज्ञानेश्वर गायकवाड , प्रवाह रुईकर, प्रसाद कुलकर्णी, प्रथमेश रुईकर, श्याम दिलवाले, अंबादास सातपुते, युवराज कांबळे, अमित शिंदे, विकास गायकवाड , गणेश मिटकर, गणेश बरकसे , सौ . शोभा प्रकाश दावणगिरे, कैलास मडकर, रवींद्र मडकर, महावीर मडकर, ज्योती मडकर, राऊत, औटे, सागर माताडे यांच्यासह शहरातील गायक – वादक कलावंत मोठया संख्येने उपस्थित होते .

# ट्रेन तिकीटांच्या बुकींग नियमांत मोठा बदल; आता याच लोकांना मिळणार लोअर बर्थ

**ट्रेन तिकीटांच्या बुकींग नियमांत मोठा बदल ; आता याच लोकांना मिळणार लोअर बर्थ**

नवी दिल्ली : रेल्वे प्रवाशांची सुविधा लक्षात घेऊन तिकीट बुकींगच्या प्रक्रीयेला अधिक सोपी आणि पारदर्शक बनवण्यासाठी अनेक महत्वाचे बदल केले जात आहेत . रेल्वेने ' रेल्वेवन ' नामक एक सुपर ॲप लाँच केले आहे . हे ॲप प्रवाशांच्या एक वन–स्टॉप सॉल्यूशन रुपात कार्य करते . ज्याच्या माध्यमातून आरक्षित तसेच अनारक्षित तिकीट देखील बुक करता येणार आहे .

याशिवाय या ॲपवर ट्रेनची लाईव्ह स्थिती, प्लॅटफॉर्मची माहिती आणि अन्य सेवा देखील उपलब्ध आहेत . अनेकदा प्रवाशांची तक्रार असते की ' लोअर बर्थ प्रेफरेंस ' निवडूनही त्यांना साईड अपर, मिडील वा अपर बर्थ दिली जाते . या समस्येवर उत्तर शोधण्यासाठी रेल्वेने एक नवीन व्यवस्था लागू केली आहे . रेल्वेच्या संगणकीकृत आरक्षण प्रणालीत ज्येष्ठ नागरिकांना, ४५ वर्षांहून अधिक वयाच्या महिला तसेच गर्भवती महिलांना लोअरबर्थ देण्याची विशेष व्यवस्था केलेली आहे . परंतू ही सुविधा आसनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते .

या शिवाय प्रवाशांच्या जवळ आता एक विशेष पर्याय असणार आहे . ' बुक ओनली इफ लोअर बर्थ इज अव्हेलेबल ', म्हणजे जर लोअर बर्थ उपलब्ध नसेल तर तिकीट बुक होणार नाही . यामुळे प्रवाशांना त्यांच्या पसंतीनुसार आसन सुविधा मिळण्याची सोय उपलब्ध होईल .

जर बुकींगच्या वेळी लोअर बर्थ उपलब्ध नसेल आणि पात्र प्रवाशाला अपर वा मिडल बर्थ मिळाली असेल, तर आता टीटीईला अधिकार दिला गेला आहे की तो प्रवासादरम्यान रिकामी असलेली लोअर बर्थ तो अशा प्रवाशाला देऊ शकतो . रेल्वेने रिझर्व्ह कोचमध्ये झोपण्याच्या आणि बसण्याच्या वेळांसंदर्भात नियम स्पष्ट केले आहेत . रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत झोपण्याची वेळ निर्धारित केलेली आहे . या दरम्यान प्रवासी आपल्या निर्धारित बर्थवर झोपू शकतात . परंतू दिवसा बर्थवर बसण्याची व्यवस्था असेल . आरएसी प्रवाशांसाठी ही व्यवस्था आहे की दिवसा साईड लोअर बर्थवर आरएसी प्रवासी आणि साईड अपर बर्थवर बुक प्रवासी बसू शकतात . परंतू रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लोअर बर्थचा अधिकार केवळ लोअरबर्थ वाल्या प्रवाशाचा राहील .

रेल्वेने आरक्षित तिकीटांची आगाऊ आरक्षण कालावधी ( एआरपी ) १२० दिवसांहून घटवून आता ६० दिवस केला आहे . आता प्रवासी प्रवास तारखेच्या केवळ ६० दिवस आधीपर्यंत तिकीट बुक करु शकतात . हा नियम १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू झाला आहे . या पावलाचा उद्देश्य तिकीट बुकींगमध्ये पारदर्शकता आणणे आणि ' सिट ब्लॉकिंग ' सारख्या प्रवृत्तीला समाप्त करणे आहे . रेल्वे प्रवाशांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी बुकींगच्या वेळी आपली प्राथमिकता नोंदवावी .

# प्रलंबित मागण्या मंजूर न झाल्यास दिला राज्यव्यापी आंदोलनाचा ईशारा

## ➤ एस टी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा उत्साहात

**➤ बीड: प्रतिनिधी**

गुरुवार रोजी श्री छत्रपती महाविद्यालय एन–3 सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला . या मेळाव्यास मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, हिंगोली तसेच सोलापूर जळगाव बुलढाणा जिल्ह्यातुन 300 पेक्षा जास्त एस टी सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित झाले होते . या बैठकीत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली .

1)एस टी महामंडळाने EPFO कडे सर्वीस चार्जेस न भरल्याने सेवानिवृत्त कर्मचारी यांचे हायर पेन्शन मंजुर होत नाही . एस टी महामंडळाने सर्वीस चार्जेस त्वरित भरावेत .

2 ) सन 2016 ते 2020 व 2022 ला झालेल्या करारानुसार झालेल्या वेतन वाढीच्या फरकाची व विविध भत्त्यांची रक्कम त्वरित एक रक्कमी देण्यात यावी .

4 ) उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्या प्रमाणे वर्षभराचा एस टी पास देण्याचे परिपत्रक त्वरित काढावे व महामंडळाच्या सर्व बस मध्ये प्रवास विना फरक प्रवासास मुभा देण्यात यावी .

सदर पास हा कर्मचारी व पत्नी यांना स्वतंत्र स्मार्टकार्ड व डीजीटल स्वरूपात देण्यात यावा .

4 ) पास देताना स्वेच्छा निवृत्ती घेतलेले व राजीनामा दिलेले असा भेद भाव न करता ज्या कर्मचाऱ्यांची सेवा 10 वर्षे झाली त्यांना सुद्धा पास देण्यात यावी .

5 ) 1995 साली झालेल्या कराराच्या रक्कमेतुन संघटना निधी म्हणून कपात झालेली 5% रक्कम त्वरित सेवा निवृतांना परत देण्यात यावी .

6 ) काही सेवानिवृत्त कर्मचारी/ अधिकारी यांचे द्वितीय अपिल प्रलंबित आहेत ते त्वरित निकाली काढण्यात यावेत .

वरील व इतर मागण्यावर डॉ पी एन पाटील, ( माजी प्रादेशिक अभियंता व EPS 95 NAC चे राष्ट्रीय मुख्य सल्लागार ) ह्यांनी आपल्या मुद्देसुद व सविस्तर मार्गदर्शनात हायर पेन्शन न मिळण्यासाठी एस टी प्रशासन जबाबदार असल्याचे सांगितले . एस टी प्रशासनाने सर्वीस चार्जेस भरले तर सेवानिवृत्त कर्मचारी यांना किमान रु . 15000/– ते 35000/– पेन्शन मिळु शकते परंतु एस टी प्रशासनचे आडमुठ्या धोरणामुळे हे होत नाही . तसेच राज्यस्थान सरकार तेथील एस टी कामगारांना स्वत : रु 25000/– ते रु 65000/– पेन्शन देते तर महाराष्ट्र शासन का देत नाही ? असा प्रश्न उपस्थित केला . या वेळी एस एन आंबेकर ( अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश NAC ) ह्यांनी मोफत पास , ST च्या हायर पेंशन व अन्य न्याय मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी संबंधीत मंत्री महोदयाचे उपस्थितीत लवकरच नांदेड येथे मेळावा घेणार असून आपण सर्वांनी उभयता उपस्थित राहून भावी यशाचे साथीदार व्हावे असे आवाहन केले . आणि मा . कमलाकर पांगारकर ( कार्याध्यक्ष NAC ), ह्यांनी सुद्धा सांगितले की, मा कमांडर अशोक राऊत ह्यांचे नेतृत्वात ' फक्त ST च नाही तर ईतर कोणत्याहि आस्थापना किंवा उद्योगातील सेवानिवृत कामगारावर होणारा अन्याय ह्या पुढे अजिबात खपवून घेतला जाणार नाही . तसेच मा हरिभाऊ व्यवहारे ( उपसचिव महाराष्ट्र प्रदेश NAC ) ह्यांनी सुद्धा ST सेवा निवृताचे न्याय हक्का साठी अविरत प्रयत्नरत सर्वच राहूयात असे आवाहन करित समयोचित संबोधन केले . अन्य कार्यकर्ते ह्यांनी सुद्धा समयोचित भाषणे केली व आपल्या समस्या पण मांडल्यात . आयोजक डी ए लिपणे–पाटील यांनी प्रास्ताविक केले , तर साहेबराव निकम यांनी आभार प्रदर्शन केले . बहारदार सुत्रसंचलन हारुन पठाण यांनी केले .



या बैठकीस हिम्मतराव देशमुख, बि के देशमुख, कल्याण शिंदे, बबन वडमारे, मुरलीधर पोपळघट, पी एन मिरगे , ए के राऊत ' कुंडलकर, सय्यद अहेमद, अच्युतराव माने, देविदास कल्याणकर इकबाल शेख, सुधाकर गायके, किसन साळवे, सोपान बांगर रामचंद्र नवपुते, नाना मराठे, भागाजी कालभिले आदींची उपस्थिती होती .

मेळावा यशस्वी करण्यासाठी डी ए लिपने–पाटील, साहेबराव निकम, सुधाकर गायके, ह्यांनी विशेष परिश्रम घेतले .

# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# शासकीय कापूस खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ;
## माजलगाव बाजार समितीच्या प्रयत्नांना यश

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वतीने शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्रीसाठी नोंदणीची मुदत दि . ३१ ऑक्टोबर पर्यंतच होती . परंतु माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच . एन . सवणे यांनी सिसीआयशी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती . याची दखल घेत सिसीआयने दि . ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणीची मुदतवाढ दिली असल्याने शेतक–यांना दिलासा मिळाला आहे .

हवामानातील अनिश्चितता, हंगामाच्या शेवटपर्यंत झालेला पाऊस आणि शेतकऱ्यांची कापूस वेचणी सुरू न झाल्याने मोठ्या संख्येने शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता होती . या पार्श्वभूमीवर माजलगाव बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी CCI तसेच कृषी खात्याकडे वेळो – वेळी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती . याची दाखल कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( सिसीआय ) ने घेत शासकीय कापूस खरेदी नोंदणीची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ वरून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे . या निर्णयामुळे माजलगाव तालुक्यातील तसेच अनेक भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, कापूस हमीभावाने विक्रीसाठी अधिक शेतकरी नोंदणी करू शकतील . ३१ डिसेंबर पर्यंत झालेल्या मुदतवाढीत शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त नोंदी करून घ्याव्यात व नोंदी पासून कोणीही शेतकरी बांधवांनी वंचित राहू नये असे आवाहन उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव चे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच . एन . सवने यांनी केले आहे .


जयदत्त नरवडे , सभापती


श्रीहरी मोरे , उपसभापती


हरिभाऊ सवणे , सचिव




---

## विशेष

# काय सांगता ? २८० किलोच्या हिंदकेसरी कॅप्टन बैलाची इतक्या लाखांना विक्री

छत्रपती संभाजीनगर : फक्त २८० किलो वजन, चमकदार शरीर, मजबूत बांधा, वेगवान चाल यामुळे संपूर्ण मराठवाड्यात लोकप्रिय असलेल्या हिंदकेसरी कॅप्टन बैलाची १६ लाख ५१ हजार रुपयांमध्ये विक्री झाली . छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील वाकी या गावातील कॅप्टन नावाच्या बैलाची खरेदी मध्य प्रदेशमधील बैतुलच्या पशूप्रेमीने केली आहे .

कन्नड तालुक्यातील आदर्श गाव अशी वाकी गावाची ओळख आहे . या वाकी गावात राहणाऱ्या बाजीराव जंजाळ यांनी त्यांच्याकडे असलेल्या कॅप्टन बैलाची १६ लाख ५१ हजार रुपयांमध्ये विक्री केली . काही वर्षांपूर्वीच बाजीराव जंजाळ यांनी कॅप्टनची खरेदी केली होती . कॅप्टन हा मैसूर ढीलारी जातीचा बैल आहे . या बैलाला संतुलित आहार आणि प्रशिक्षण देण्यासाठी तसेच त्याची नियमित देखभाल करण्यासाठी त्यांनी दोन कर्मचारी नियुक्त केले होते . दुधासाठी दोन गायी खरेदी केल्या होत्या . दोन गायी सकाळ– संध्याकाळ पाच पाच लिटर दूध देत . हे दूध कॅप्टनला नियमित दिले जात होते . कॅप्टनला नियमित आंघोळ घातली जात होती . त्याला जमिनीवर चटई अंथरुन कायम त्यावर बसवले जात होते . कॅप्टनचे वजन २८० किलो आणि उंची पाच फूट सहा इंच होती . या सौंदर्यामुळे कॅप्टनची ओळख एक आदर्श बैल म्हणून झाली होती .

काही दिवसांपूर्वी हरिदास जंजाळ एका स्पर्धेसाठी कॅप्टन बैलाला घेऊन गेले होते . या स्पर्धेच्या निमित्ताने उत्तर प्रदेश येथील रामप्रसाद राठोड या पशूप्रेमीची नजर कॅप्टन वर पडली . यानंतर रामप्रसाद राठोड यांनी कॅप्टन बैल खरेदी करण्याचा निर्णय घेतला आणि हरिदास जंजाळ यांच्याशी चर्चा केली . चर्चेअंती सौदा निश्चित झाला . अखेर रामप्रसाद राठोड यांनी कॅप्टन बैलाची खरेदी केली .



# टाटा मिनी बसचा अपघात, गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगावला निघालेल्या दोघांचा मृत्यू

कर्जत : समृद्धी महामार्गावर कर्जतजवळ बोगद्यात टाटा मिनी बसचा अपघात झाला . चालकाला डुलकी लागल्यामुळे त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले . मिनी बस बोगद्याच्या कडेला असलेल्या साईड बॅरिकेटला जोरात धडकली . हा अपघात झाला त्यावेळी बस वेगात होती त्यामुळे अपघातात जीवितहानी झाली . गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगावला निघालेल्या दोन भाविकांचा या अपघातात मृत्यू झाला आणि तीन भाविक गंभीर जखमी झाले . अपघातामुळे काही काळ समृद्धी महामार्गावर कर्जत बोगदा येथे कोलमडलेली वाहतूक पोलिसांनी सुरळीत केली आहे .

टाटा मिनी बस समृद्धी महामार्गावर कर्जतजवळ बोगद्यात कडेला असलेल्या साईड बॅरिकेटला जोरात धडकली . या अपघातात मिनी बसचा चालक दत्ता ढाकवळ याचा जागीच तर प्रवासी सुरेश गौरू लाड यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला . सुरेखा लाड, नंदकुमार मोरे आणि राजेश विश्वनाथ लाड हे प्रवासी गंभीर जखमी झाले . जखमी प्रवाशांवर इगतपुरी ग्रामीण रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत .

अपघात प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे . आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मिनी बसचा चालक दत्ता ढाकवळ आणि प्रवासी सुरेश गौरू लाड या दोघांचे पार्थिव नातलगांना सोपवले जाणार आहे .



# टेनिसपटू रोहन बोपण्णाची टेनिसमधून निवृत्ती

मुंबई : भारताचा स्टार टेनिसपटू रोहन बोपण्णा याने निवृत्तीची घोषणा केली आहे . वयाच्या ४३ व्या वर्षी तो पहिल्यांदाच मिश्र दुहेरीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आणि ही कामगिरी करणारा तो सर्वात वयस्कर खेळाडू ठरला . त्याने आता त्याच्या कारकिर्दीला निरोप दिला आहे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म याची घोषणा केली आहे .

रोहन बोपण्णा यांनी एक्सवर पोस्ट केले, “तुमच्या आयुष्याला अर्थ देणाऱ्या गोष्टीला तुम्ही कसे निरोप देता ? पण २० अद्भुत वर्षांनंतर, वेळ आली आहे . हे लिहिताना, माझे हृदय जड आणि कृतज्ञ आहे . भारतातील कुर्गमधील एका लहान शहरातून माझा प्रवास सुरू करणे, माझी सर्व्हिस मजबूत करण्यासाठी लाकूड तोडणे, सहनशक्ती वाढवण्यासाठी कॉफीच्या बागांमधून धावणे आणि तुटलेल्या कोर्टवर स्वप्नांचा पाठलाग करणे, हे सर्व अवास्तव वाटते .” टेनिस हा माझ्यासाठी कधीच फक्त एक खेळ राहिला नाही . जगाने माझ्यावर शंका घेतल्यावरही त्याने मला आत्मविश्वास दिला आहे . माझे पालक माझे हिरो आहेत . त्यांनी मला सर्व काही दिले आहे . माझी बहीण रशिम नेहमीच माझ्यासोबत राहिली आहे . तिने प्रत्येक अडचणीत मला प्रोत्साहन दिले . माझ्या कुटुंबाचे माझ्या पाठीशी उभे राहिल्याबद्दल आभार . कुटुंबाव्यतिरिक्त, बोपण्णाने प्रत्येक प्रशिक्षक, भागीदार, प्रशिक्षक, फिजिओ, माझा संघ आणि माझ्या मित्रांच्या जगाचे आभार मानले . माझ्या सहकाऱ्यांचे आदर, स्पर्धा आणि बंधुत्वाबद्दल धन्यवाद . शेवटी, माझ्या चाहत्यांसाठी, तुमचे प्रेम माझ्यासाठी उर्जेचा स्रोत राहिले आहे . मी जिंकलो तेव्हा तुम्ही माझा आनंद साजरा केला आणि मी पडलो तेव्हा माझ्या पाठीशी उभे राहिले .

---

# दिंद्रुड पंचायत समिती गणासाठी उमरीकरांना मिळणार संधी

**सौ . वर्षा वैजनाथ घायतिडक यांची पं.स.गणाच्या उमेदवारीची मागणी**

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**



तालुक्यातील दिंद्रुड जिल्हा परिषद गट हा यावेळी सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाला आहे . तसेच दिंद्रुड पंचायत समिती गण हाही सर्वसाधारण महिलेसाठी सुटला असून, यामुळे या भागात नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे .

पूर्वी वारंवार या गणात दिंद्रुड येथील उमेदवारांना प्राधान्य मिळत आले असले तरी, यावेळी उमरी येथील सौ . वर्षा वैजनाथ घायतिडक या प्रबळ दावेदार ठरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे .

उमरी गाव हे या गणातील सर्वाधिक मतदार असलेले गाव असून, सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या पत्रकार वैजनाथ घायतिडक यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत . त्यांनी काही काळ ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्य करताना गावातील विविध समस्या सोडवण्याचे काम केले आहे . पंचायत समिती गणातील अनेक गावांमध्ये जाऊन त्यांनी सामान्य मतदारांच्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे . विशेष म्हणजे, निराधार लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात त्यांचा सहभाग राहिला आहे .

यामुळेच यावेळी दिंद्रुड पंचायत समिती गणासाठी सौ . वर्षा वैजनाथ घायतिडक या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रबळ दावेदार म्हणून चर्चेत आहेत . त्यांनी आ .प्रकाश सोळंके व लोकनेते सुंदरराव सोळंके कारखाना व्हॉ . चेअरमन जयसिंग सोळंके यांच्यासह पक्षाकडे अधिकृत उमेदवारीसाठी मागणी केली असून, स्थानिक पातळीवर त्यांना मोठा जनाधार मिळत असल्याचे बोलले जाते .

# सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालयावर उपोषण

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई येथील सेवा निवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कृती समितीच्या कर्मचा–यांना आ . प . योजनेतील दुसरा लाभ देण्यासाठी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव यांनी आदेश दिलेले असतांनाही कार्यकारी अभियंता सा . बा . विभाग अंबाजोगाई यांनी वेतन व भत्याचा फरक न दिल्याने समितीच्या वतीने सा . बा . प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे दि . ६ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरण उपोषण करण्याचा इशारा समितीचे सचिव आनंद विठ्ठलराव झगडे यांनी दिला आहे .

सेवा निवृत्त स्था . अ . स . यांना शासन निर्णयाप्रमाणे दि . १ .१० .२००६ ते सेवानिवृत्ती पर्यंतचा रोखीने फरक देण्यात यावा, सेवा निवृत्त स्था . अ . स . यांना रजारोखीकरणाचा ०७ दिलेला फरक देण्यात यावा, सेवा निवृत्त स्था . अ . स . यांना २४ वर्षाचा लाभ न दिल्यामुळे दि . ३१ .०७ .२०१३ प्रमाणे सुट दिल्यापासुन फरक देण्यात यावा यासह विवीध मागण्यांसाठी सेवा निवृत्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कृती समितीचे सचिव आनंद झगडे, सहसचिव नारायण मारोती डाके यांनी दि . १ .११ .२०२५ पासुन कार्यकारी अभियंता सा . बा . विभाग अंबाजोगाई यांचे कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे .

# प्रदीर्घ काळाचे प्रभारी राज संपुष्टात! कायमस्वरुपी गट शिक्षणाधिकारीपदी मनोज चव्हाण यांची वर्णी

➤ **पैठण : सर्जेराव खडसन**

मागील काही वर्षांपासून पंचायत समिती विभागाच्या शिक्षण विभागास कायमस्वरुपी गट शिक्षणाधिकारी मिळत नसल्याने म्हणा किंवा कोणी यापदी विराजमान होण्यास तयार नसल्यामुळे आतापर्यंत तालुका गट शिक्षण विभागाचा कारभार प्रभारीगट शिक्षणआधिकारीच पाहत होते . प्रभारी शिक्षण अधिकारी असलेले श्रीराम केदार यांनी या दरम्यानच्या काळात या शिक्षण विभागाचे काम चांगल्या पद्धतीने हताळले असल्याने पैठण पंचायत समितीच्या वतीने त्यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या चांगल्या कार्याबद्दल शिक्षण मंत्री यांच्या हस्ते पुरस्कार देखील मिळाला आहे . परंतु आता प्रदीर्घ काळानंतर पैठण पं . स . ला नविन गट शिक्षणाधिकारी म्हणून मनोज चव्हाण रुजू झाले असल्याने त्यांचा शिक्षण विभाग, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, व शिक्षक संघटनाच्या वतीने करण्यात आले .



यावेळी मा .शिक्षण विस्तार अधिकारी मुस्ताक शेख, शिक्षक संघाचे जिल्हा सरचिटणीस कैलास गायकवाड, स्वीकृत सदस्य बळीराम भुमरे, माजी मुख्याध्यापक राजेंद्र ढाकणे, स्वीकृत संचालक हारून शेख, जेष्ठ नेते किशोर झोटे, संचालक शमिम पठाण, तालुका अध्यक्ष योगेश्वर शिसोदे, सरचिटणीस समशेर पठाण, कार्याध्यक्ष नारायण बहिर, पांडुरंग बाचकर, युनूस चौधरी, सचिन जोशी, श्रीपाद कुलकर्णी, जेष्ठ नेते अनिल अहिरराव, सहकार्याध्यक्ष जयसिंग खेडकर, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब बडे, शहराध्यक्ष अहेमद शेख, मनोज साळुंके, सुनिल म्हस्के, गाणी शेख, ईतर शिक्षकांची उपस्थिती होती .

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी 'या' दिवशी लागणार आचारसंहिता, सूत्रांची माहिती

मुंबई : राज्यात सध्या सर्वांनाच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत . त्यात न्यायालयाने निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घ्याव्या असे आदेश दिले आहेत . त्यामुळे नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या आसपास निवडणुकांचे बिगूल वाजणार असल्याचा अंदाज आहे . या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने कोणत्याही अधिकृत तारखा जाहीर केल्या नसल्या तरी राज्यातील सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत . दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे .



मागील पाच वर्षांपासून महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुका रखडलेल्या आहेत . न्यायालयाच्या आदेशानंतर या निवडणुका लवकरच पार पडणार आहेत . सूत्रांच्या माहितीनुसार, पुढील आठवड्यात निवडणुकांच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता आहे . ५ किंवा ६ नोव्हेंबरला निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर होऊ शकते . यानंतर लगेच आचारसंहिता लागणार आहे .

**तीन टप्प्यात निवडणुका होण्याची शक्यता**

सूत्रांच्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात नगरपालिका, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आणि तिसऱ्या टप्प्यात महानगरपालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे .

# मुंबई-नाशिक महामार्गावर कंटेनरचा अपघात, चालक जखमी

ठाणे : कॅडबरी जंक्शन उड्डाणपुलाजवळ कंटेनरचा अपघात झाला . या अपघातात कंटेनर चालक जखमी झाला . जखमी चालकाला ठाणे जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे . चालकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत .

कामता पाल ( ५० ) असे अपघातात जखमी झालेल्या कंटेनर चालकाचे नाव आहे . कामता पाल हा रविवारी कळंबोलीहून गुजरातच्या दिशेने कंटेनर घेऊन निघाला होता . कंटेनर मुंबई– नाशिक महामार्गावरील कॅडबरी जंक्शन जवळील उड्डाणपुलाच्या उतरणीवर असताना अपघात झाला . चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला . कंटेनर रस्ता दुभाजकाला अर्थात डिव्हायडरला धडकला . अपघाताची माहिती मिळताच राबोडी पोलीस, वाहतूक पोलीस, २ हायड्रा मशीन, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले .

# कवी ज्ञानेश्वर गायके यांना तिफण राज्यकाव्य पुरस्कार जाहीर

**“पेरणी” कविता संग्रहासाठी गौरव; महोत्सवात होणार सन्मान**

➤ **कन्नड : विशाल भालेराव**



तालुक्यातील खामगाव येथील कवी ज्ञानेश्वर गायके यांना त्यांच्या “पेरणी” या कवितासंग्रहासाठी यंदाचा तिफण राज्यकाव्य पुरस्कार जाहीर झाला आहे . ग्रामीण आणि शेतकरी जीवनाचे वास्तव दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या काव्यलेखनाची प्रशंसा होत आहे .

हा पुरस्कार येत्या जानेवारीत होणाऱ्या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवात प्रदान केला जाणार असून, या महोत्सवाचे आयोजन त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ आणि भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषद, कन्नड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे .

कवी गायके हे पंचायत समिती, कन्नड येथे कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत असून, “पारखं झालंय गाव” हा त्यांचा आगामी कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे . या यशाबद्दल तिफण कविता महोत्सवाचे संयोजक डॉ . शिवाजी हुसे तसेच डॉ . विजय भोसले, ॲड . कृष्णा जाधव, डॉ . सिताराम जाधव, उत्तमराव राठोड, सागर जाधव आणि संपूर्ण संयोजन समितीने कवी ज्ञानेश्वर गायके यांचे अभिनंदन केले .

# कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसा निमित्त रुग्णांना बैठक व्यवस्था

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील दिंद्रुड पंचायत समितीचे माजी सदस्य सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिंद्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्यात आली .

सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी गेल्या काही महिन्यांपासून दिंद्रुड मध्ये स्वखर्चाने विकास कामांचा धूम धडाका लावला आहे, ३१ ऑक्टोंबर रोजी कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराने स्वखर्चातून येथे नवीनच सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रांगणात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था केली . वाढदिवसानिमित्त आवाजावी खर्च करण्यापेक्षा सामाजिक हिताचे कार्य करणे या मागचा हेतू होता . त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे . ग्रामपंचायत सदस्य अतुल चव्हाण, पत्रकार अमोल ठोंबरे, संतोष स्वामी, नागेश वकरे, गणेश काटकर, बाबासाहेब देशमाने, नागेश कानडे, किशोर ठोंबरे, राजेश स्वामी यांची यावेळी उपस्थिती होती .



# एन्काउंटर केलेल्या सहाय्यक निरीक्षकासोबत सरकारी अधिकाऱ्यांचीसुद्धा होणार चौकशी

## रोहित आर्य प्रकरणात मोठी अपडेट

➤ मुंबई : पवईत एका स्टुडिओमध्ये १७ मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्यवर सहाय्यक निरीक्षक अमोल वाघमारे यांनी गोळी झाडली . या कारवाईत रोहितचा मृत्यू झाला . आता या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी होणार असून, गुन्हे शाखेसमोर या चकमकीचे पुरावे गोळा करणे हे मोठे आव्हान असणार आहे . रोहितने राज्य सरकारच्या शिक्षण विभागावर फसवणुकीचा आरोप केला होता, त्यामुळे या प्रकरणाचीही चौकशी होण्याची शक्यता आहे .

पवईच्या महावीर क्लासिक इमारतीमधील आर . ए . स्टुडिओमध्ये रोहित आर्य याने १७ मुलांना ओलीस ठेवले होते .



यावेळी मुलांना सोडवण्यासाठी स्टुडिओत शिरलेल्या सहाय्यक निरीक्षक अमोल वाघमारे यांनी रोहितवर गोळी झाडली . छातीत गोळी लागल्याने रोहितचा जागीच मृत्यू झाला . या प्रकरणाच्या तपासणीची जबाबदारी गुन्हे शाखेकडे ( क्राइम ब्रँच ) सोपवण्यात आली आहे .